

# Rayat Shikshan Sanstha's
# Balwant College, Vita
# News Clippings
# 2023-2024

Muktagiri 14-03-2024



विटा : बळवंत कॉलेजला प्रथम क्रमांकाचे बक्षिस वितरण करताना शरद मेमाणे, विक्रमसिंह बांदल, विक्रमसिंह पाटील

# स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये बळवंत कॉलेजला प्रथम क्रमांक

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**विटा, दि. १५ :** येथील नगरपालिके मार्फत घेण्यात आलेल्या स्वच्छता सर्वेक्षण २०२४ व माजी वसुंधरा ४.० अंतर्गत झालेल्या स्वच्छ व सुंदर महाविद्यालय स्पर्धेत बळवंत कॉलेजला प्रथम क्रमांक मिळाला.

सदरचा पुरस्कार प्रदान वितरण सोहळा नगरपरिषद विटा येथील सभागृहामध्ये संपन्न झाला. पोलीस स्टेशनचे पोलीस प्रमुख शरद मेमाणे व प्रशासक विक्रमसिंह बांदल, मुख्याधिकारी विक्रमसिंह पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप म्हणून महाविद्यालयास सन्मानपत्र, स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले. सदरचा पुरस्कार प्राचार्य विठ्ठल शिवणकर, ज्यु. उपप्राचार्य प्रा. विष्णू मस्के, एन.एस.एस. समन्वयक प्रा. डॉ. प्रवीण बाबर, संकेत राठोड, प्रा. प्रशांत गांजवे यांनी सत्कार स्वीकारला.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकात दळवी, सचिव विकास देशमुख, सहसचिव डॉ. ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य व ऑडिटर डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी अभिनंदन केले.

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Tarun Bharat Sanwad 03-03-2024

# विट्याच्या बळवंत कॉलेजला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार



विटा : राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, डॉ. राजा दयानिधी यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर.

प्रतिनिधी
विटा

जिल्हा निवडणूक अधिकारी सांगली यांच्यावतीने २०२४ चा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार विटा येथील बळवंत कॉलेजला प्रदान करण्यात आला. सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. पुरस्कार विजेत्या पथकाचे महाविद्यालय आणि रयत शिक्षण संस्थेकडून कौतुक होत आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक आधिकारी श्रीकांत देशपांडे, सांगली आधिकारी डॉ. प्रवीण बाबर, तसेच प्रा. राहुल पाटील, कॅम्पस अँबेसिटर विद्यार्थी सुरज जगदाळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

येथील बळवंत कॉलेजमध्ये विशेष नवमतदार नोंदणी मोहिम राबवून विक्रमी संख्येने नवमतदार नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली. मतदार जागृतीसाठी महाविद्यालयात आणि विटा शहरात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. सदरचा पुरस्कार प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, तहसिलदार उदयसिंह गायकवाड.

तरुण भारत संवाद 14:00

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Lokmat 02-03-2024



विटा येथील बळवंत महाविद्यालयाला तत्कालीन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# बळवंत महाविद्यालयाला मतदार नोंदणीचा पुरस्कार

## मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**विटा :** नवमतदार नोंदणी विशेष मोहीम प्रभावीपणे राबवून विक्रमी संख्येने नवमतदारांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या विटा येथील बळवंत कॉलेजला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याचे तत्कालीन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते व सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विटा येथे तहसीलदार उदयसिंह गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली बळवंत महाविद्यालयात विशेष नवमतदार नोंदणी मोहीम राबविण्यात आली होती. यावेळी विक्रमी संख्येने नवमतदारांची नोंदणी प्रक्रिया पार पडली. तसेच मतदार जागृतीसाठी महाविद्यालयासह विटा शहरात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले होते. या सर्व कामांची दखल घेऊन बळवंत कॉलेजला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, नोडल अधिकारी डॉ. प्रवीण बाबर, प्रा. राहुल पाटील, कॅम्पस ॲम्बॅसडर विद्यार्थी सूरज जगदाळे यांनी तत्कालीन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, सहसचिव डॉ. ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी बळवंत महाविद्यालयाचे अभिनंदन केले.



BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Denik Sakal 01-03-2024



विटा : उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मान्यवरांकडून स्वीकारताना बळवंत कॉलेजचे प्राचार्य विठ्ठल शिवणकर, डॉ. प्रवीण बाबर व अन्य.

# बळवंत कॉलेजला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

विटा, ता. २९ : जिल्हा निवडणूक अधिकारी सांगली यांच्यावतीने २०२४ चा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार येथील बळवंत कॉलेजला जिल्हाधिकारी कार्यालय सांगली येथे प्रदान केला.

महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक आधिकारी श्रीकांत देशपांडे, सांगली जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांचेहस्ते हा पुरस्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, नोडल आधिकारी डॉ. प्रवीण बाबर, प्रा. राहुल पाटील, कॅम्पस ॲम्बॅसेडर विद्यार्थी सूरज जगदाळे यांनी स्वीकारला. बळवंत कॉलेजमध्ये विक्रमी नवमतदार नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली. महाविद्यालयात व विटा शहरात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, तहसीलदार उदय गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. पुरस्कार प्राप्तीबद्दल संस्थेचे अध्यक्ष चंद्रकात दळवी, विकास देशमुख, डॉ. ज्ञानदेव म्हस्के, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी स्टाफचे अभिनंदन केले.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Tarun Bharat-08/02/2024

तरुण भारत संवाद

# उद्योगासाठी कौशल्य विकसित करावित

## डॉ. शिवणकर : व्यापार मेळ्याला प्रतिसाद : दोन हजारहून नागरिकांची स्टॉलला भेट

प्रतिनिधी
विटा

आजच्या काळात विद्यार्थ्यांनी फक्त पदवी पुरते मर्यादित न राहता वर्तमान आणि भविष्याची गरज ओळखून आपल्यातील कौशल्य विकसित केली पाहिजेत. केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्यमशील बनले पाहिजे. महाविद्यालयीन पातळीवरच त्यासाठी ज्ञान आत्मसात केले पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी मांडले.

कॉमर्स आणि व्यवस्थापन विभागाच्या विद्यार्थ्यांना उद्योगशील बनविण्यासाठी 'पाऊल पडते उद्योजकतेकडे' हे घोषवाक्य घेऊन येथील बळवंत महाविद्यालयात ट्रेड फेअरचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये व्यापार कौशल्य विकसित व्हावे, त्यांनी व्यवहार ज्ञान समजून घ्यावे या अनुषंगाने आयोजित व्यापार मेळ्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

रयत शिक्षण संस्थेच्या बळवंत कॉलेज मधील कॉमर्स अँड मॅनेजमेंट, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने व्यापार मेळ्याचे आयोजन करण्यात आले. मेळ्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्याहस्ते झाले. यावेळी डॉ. शिवणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील बी. कॉम., एम. कॉम. आणि बी कॉम. आय. टी. चे विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.





विटा : बळवंत महाविद्यालयात ट्रेड फेअरचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. विठ्ठलराव शिवणकर, डॉ. श्रेया पाटील, प्रा. राणी चव्हाण आदी. दुसऱ्या छायाचित्रात ट्रेड फेअरला नागरीकांचा मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध वस्तू विक्रीचे १३ स्टॉल मांडले होते. यामध्ये भेळ, चायनीज, स्प्रिंग बटाटा, दाबेली, कोबी मंचुरियन, बिर्याणी, पाणीपुरी, मठ्ठा, लस्सी, आईस्क्रीम, ताक, ऊसाचा रस, सरबत, अगरबत्ती इत्यादी वस्तू व पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. दिवसभरात जवळपास दोन हजार पेक्षा अधिक लोकांनी बळवंतच्या मैदानावर आयोजित व्यापार मेळ्याला भेट दिली.

आजच्या पिढीने उत्पादन विक्रीसाठी आवश्यक असलेले ज्ञान, नवीन कौशल्य, संघटन कौशल्य, व्यवसायाची ओळख, विक्रीकला, स्पॉन्सरशिप, बाजार कौशल्य, जाहिरात, डिजिटल च्या माध्यमातून लोकांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यासाठीचे प्रात्यक्षिक ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत झाले. या उपक्रमामधून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ताळेबंद, स्पर्धात्मक निर्णय क्षमता आदी बाबी लक्षात येतात, असे मत कॉमर्स व व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. श्रेया पाटील यांनी व्यक्त केले.

समन्वयक प्रा. राणी चव्हाण, डॉ. एस. एच. कोकरे, प्राध्यापिका रंजना बागल, स्नेहल कुंभार, सुधा कांबळे, ऋतुजा कदम, प्रियांका कोडूलकर, वैष्णवी होनराव आणि महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Sakal-12/01/2024

# अभ्यासाबरोबरच आहार, व्यायाम महत्त्वाचा : डॉ. शिंदे

प्रतिनिधी
विटा

विद्यार्थ्याकडून पालकांच्या अपेक्षा वाढल्या असून मुलांना बौद्धिक क्षमतेपेक्षा जास्त ओझं दिले जात आहे. त्याचवेळी विद्यार्थ्यांच्या आहाराकडे आणि व्यायामाकडे तितकेच महत्त्व देणे गरजेचे आहे. शासनाकडून वेळोवेळी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते त्यामध्ये सहभागी होऊन औषध उपचार घ्यावेत, असे मत ग्रामीण रुग्णालय विटाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत महाविद्यालय येथे उच्चमाध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. विजय शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य विष्णू मस्के होते.

उपप्राचार्य डॉ. विष्णू मस्के म्हणाले, उच्चमाध्यमिक महाविद्यालयातील विद्यार्थी कुमार अवस्थेतून युवा अवस्थेत पदार्पण करीत असतात. या वाढत्या वयामध्ये आपणास छोटे मोठे आजार असतात. आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याची शक्यता असते. भविष्य काळामध्ये त्यामुळे आपणाला मोठ्या गंभीर परिणामाला सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळीच आपल्या आरोग्य बाबतच्या समस्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना मनमोकळेपणाने सांगाव्यात. शासनाने सर्वसामान्य लोकांसाठी उपलब्ध केलेल्या मोफत विविध वैद्यकीय मोफत योजनांचा फायदा घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. मस्के यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख संताजी सावंत, सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले तर आभार आप्पासो वानकर यांनी मानले. यावेळी डॉ. विक्रमसिंह देशमुख, पर्यवेक्षक सर्जेराव सावंत, अजित साळुंखे, संताजी सावंत, समन्वयक आप्पासो वानकर, अमोल ठुबे, महेश बाबर, मेघा जाधव, स्नेहा सूर्यवंशी उपस्थित होते.



**विटा : येथील बळवंत महाविद्यालयात वैद्यकीय अधिकारी विजय शिंदे यांचा सत्कार करताना उपप्राचार्य डॉ. विष्णू मस्के, पर्यवेक्षक सर्जेराव सावंत, संताजी सावंत, मनिषा शिंदे आदी.**

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Sakal-06/01/2024

# अवतीभवती

## 'बळवंत'चे आज देवेखिंडीत शिबिर

**विटा :** येथील बळवंत कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर देवेखिंडी (ता.खानापूर) येथे उद्या(ता. १) पासून ७ जानेवारी पर्यंत आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी दिली. उद्या खानापूरचे उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल यांच्या हस्ते उद्‌घाटन असून पोलीस निरीक्षक संतोष डोके पाहुणे आहेत. सरपंच रुक्मिणी निकम, उपसरपंच विक्रम निकम यांची उपस्थिती आहे. रविवारी (ता. ७) शिवाजी विद्यापीठाचे डॉ. तानाजी चौगुले, निवृत्त प्रा.अंकुश निकम उपस्थित राहणार आहेत. स्वच्छता, आरोग्य तपासणी, जलसाक्षरता, प्लास्टिक निर्मूलन, महिला सबलीकरण आदी कार्यक्रमांसह गटचर्चा, व्याख्यान, विविध गुणदर्शन स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम आहेत.

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Tarun Bharat-02/01/2023

तरुण भ

# 'बळवंत' करणार श्रमसंस्कार शिबिरातून नव वर्षाची सुरूवात

## १५० विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक होणार सहभागी : प्रा.शिवणकर यांची माहिती



विटा : श्रमसंस्कार शिबिरात सहभागी विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक आदी

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खानापूर तालुक्यातील देविखिंडी येथे सोमवार एक जानेवारी ते रविवार सात जानेवारी या कालावधीत शिबिराचे आयोजन केले आहे. शिबीरात १५० विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक सहभागी होणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी दिली.

प्राचार्य डॉ. शिवणकर म्हणाले, सोमवार एक जानेवारी रोजी सकाळी १० वाजता शिबीराचे उद्‌घाटन खानापूरचे उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम बांदल यांच्याहस्ते पार पडले. विट्याचे पोलीस निरीक्षक संतोष डोके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले. देविखिंडी सरपंच रूक्मिणी निकम, उपसरपंच विक्रम निकम यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिराचा निरोप समारंभ रविवार सात जानेवारी रोजी होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, सेवानिवृत्त प्राध्यापक अंकुश निकम यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या निवासी शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने ग्रामस्वच्छता, आरोग्य तपासणी शिबिर, जलसाक्षरता, प्लास्टिक निर्मूलन, महिला सबलीकरण-सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, रस्ते दुरूस्ती, वृक्षलागवड, गावाचे आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षण, पशुधन आरोग्य तपासणी, वनराई बंधारे बांधणे, सर्वेक्षण असे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. दररोज गटचर्चा, व्याख्यानमाला, विविध गुणदर्शन स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण बाबर, प्रा. संकेत राठोड, प्रा. राणी चव्हाण यांनी केले आहे.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Janpravas-27/12/2023

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# विज्ञान प्रदर्शनातून भावी वैज्ञानिक घडतील

## ■ प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर : बळवंत कॉलेजमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

जनप्रवास । प्रतिनिधी

**विटा** : विद्यार्थ्यांकडे असणाऱ्या कल्पक प्रवृत्ती वाढीस लागण्यासाठी प्रत्येक शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केल्यास विद्यार्थ्यांची संशोधन प्रवृत्ती वाढीस लागून अंगी असणाऱ्या कलागुणानुसार वैज्ञानिक क्षेत्रामध्ये विद्यार्थी यशस्वी होऊन भविष्य काळात छोटे-मोठे वैज्ञानिक घडू शकतात, असे प्रतिपादन बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विठ्ठल शिवणकर यांनी केले.



**विटा : येथील बळवंत कॉलेजमध्ये ज्युनिअर विज्ञान विभागामार्फत विज्ञान प्रदर्शनाच्या उदघाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर. समवेत उपप्राचार्य विष्णू मस्के, प्रा.सर्जेराव सावंत व अन्य.**

येथील बळवंत कॉलेजमध्ये ज्युनिअर विज्ञान विभागामार्फत आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शन विज्ञान उपकरणे व खेळणी प्रदर्शनात उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपप्राचार्य विष्णू मस्के, प्रा. दत्तात्रय देवकाते, प्रा. अनंतराव खाडे, प्रा. सर्जेराव सावंत, प्रा. मृदुला रामटेके उपस्थित होते. तर परीक्षक म्हणून प्रा. राहुल पाटील, डॉ. बजरंग पाटील, डॉ. अण्णासाहेब सूर्यवंशी, प्रा. प्रसाद गवळी, प्रा. तानाजी सुतार यांनी काम पाहिले पुढे बोलताना डॉ. शिवणकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्याकडे असणाऱ्या प्रत्येक कल्पक विचारानुसार उपकरणे व खेळण्याच्या माध्यमातून सुंदर प्रतिकृती तयार केली आहेत. विद्यार्थ्यांस शिक्षकांनी सुंदर मार्गदर्शन केल्यामुळे हे प्रदर्शन अत्यंत चांगल्या पद्धतीने यशस्वी होत आहे.सदर प्रदर्शनात १३७ उपकरणे व २१ खेळणी तयार करून विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. प्रदर्शन पाहण्यासाठी ४५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शवली.

उपकरणामध्ये प्रथम स्वाती कारंडे, द्वितीय नेहा ठोंबरे, तृतीय निखिल खांडेकर, चतुर्थ संचिता सावंत व सायमा तांबोळी, उत्तेजनार्थ अनुष्का माने, संजना निकम, पंकज बेनकर, सुदर्शन शिंदे तसेच खेळणीमध्ये प्रथम सानिका पवार, द्वितीय मिजान पटेल यांनी यश संपादन केले. प्रास्ताविक मृदुला रामटेके, सूत्रसंचालन ओंकार शिंदे, ओंकार कुंभार यांनी केले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Janpravas-26/12/2023

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# ग्राहक जागृती व वित्तीय साक्षरता काळाची गरज

## ■ मिलन मिस्त्री: राज्यस्तरीय चर्चासत्राला प्रतिसाद

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**विटा** : येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित 'ग्राहक जागृती व वित्तीय साक्षरता' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र संपन्न झाले. २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक संरक्षण दिन म्हणून देशभर साजरा केला जातो या दिनाचे औचित्य साधून हे चर्चासत्र आयोजित करण्यात आली होते.



**विटा येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना मिलन मिस्त्री.**

याप्रसंगी बोलताना प्रमुख मार्गदर्शिका ग्राहक मार्गदर्शन सोसायटी मुंबईचे सहाय्यक मॅनेजर मिलन मिस्त्री यांनी आपल्या मनोगतामध्ये २०२३ या वर्षाच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणाद्वारे ग्राहकांचे संरक्षण या थीम अंतर्गत ग्राहकांनी मिळालेल्या हक्कानुसार जर आपलं योग्य ते मत मांडलं व हवे ते उत्पादन निवडून, फसवणूक तक्रार केली तर, ग्राहकाची फसगत होणे निश्चित थांबेल. असे मत त्यांनी व्यक्त केले.

ग्राहक संरक्षण कायदा अंतर्गत ऑनलाइन व टेलीशॉपिंग कंपन्यांच्या उत्पादनाची माहिती दिली तसेच खाद्यपदार्थ व पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास व दंडाची तरतूद आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती देणारे व प्रसारित करणाऱ्यांना दंड करण्याचा अधिकार आयोगाला आहे. या विषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या चर्चासत्रामध्ये श्रीमती मयेकर यांनी ग्राहकांना सुरक्षेचा अधिकार, निवडीचा अधिकार, तक्रार निवारणाचा अधिकार, ग्राहक जागृतीचा अधिकार, त्याचबरोबर केंद्र, राज्य व जिल्हा स्तरावर असलेल्या ग्राहक आयोगाची भूमिका या विषयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या चर्चासत्रात विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे या दृष्टीने वेगवेगळी प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही.एस. शिवणकर यांनी अध्यक्षीय मनोगतमध्ये राष्ट्रीय ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत ग्राहकांना मिळालेल्या हक्काची माहिती विद्यार्थ्यांनी अवगत करून घेतली पाहिजे.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्या, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रेया पाटील यांनी केले. चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी डॉ.एस. एच. कोकरे, प्रा.रंजना बागल, सुधा कांबळे, ऋतुजा कदम यांनी प्रयत्न केले. .चर्चासत्रात पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल कुंभार यांनी केले तर आभार चर्चासत्राच्या समन्वयक प्रा. राणी चव्हाण यांनी मानले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Tarun Bharat-26/12/2023

तरुण भारत संवाद

# ग्राहक जागृती ही काळाची गरज

## मिलन मिस्त्री : स्वच्छ ऊर्जा संक्रमणाद्वारे ग्राहकांचे संरक्षण ही २०२३ ची थीम

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालयात कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट, बीकॉम आयटी आणि आयक्यूएसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्राहक जागृती व वित्तीय साक्षरता' विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक संरक्षण दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून हे चर्चासत्र आयोजित करण्यात आली होते.

मुंबई येथील ग्राहक मार्गदर्शन सोसायटीच्या सहाय्यक मॅनेजर मिलन मिस्त्री यांनी २०२३ या वर्षाच्या 'स्वच्छ ऊर्जा संक्रमणाद्वारे ग्राहकांचे संरक्षण' या थीम अंतर्गत ग्राहकांनी मिळालेल्या हक्का नुसार आपले मत मांडले. हवे ते उत्पादन निवडून, फसवणूक तक्रार केली तर, ग्राहकाची फसगत होणे निश्चित थांबेल.


विटा : राज्यस्तरीय चर्चासत्रात मार्गदर्शन करताना मिलन मिस्त्री यावेळी उपस्थित विद्यार्थी.

ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत ऑनलाइन आणि टेलीशॉपिंग कंगन्यांच्या उत्पादनाची माहिती दिली. खाद्यपदार्थ आणि पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास आणि दंडाची तरतूद आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती देणारे आणि प्रसारित करणाऱ्यांना दंड करण्याचा अधिकार आयोगाला आहे.

मयेकर यांनी ग्राहकांना सुरक्षेचा सुरक्षेचा अधिकार, निवडीचा अधिकार, तक्रार निवारणाचा अधिकार, ग्राहक जागृतीचा अधिकार, केंद्र, राज्य आणि जिल्हा स्तरावर असलेल्या ग्राहक आयोगाची भूमिका याविषया माहिती दिली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर यांनी राष्ट्रीय ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत ग्राहकांना मिळालेल्या हक्काचे अवगत विद्यार्थ्यांनी करून घेतले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्या, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रेया पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल कुंभार यांनी तर आभार चर्चासत्राच्या समन्वयक प्रा. राणी चव्हाण यांनी मानले. चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी डॉ. एस. एच. कोकरे, प्रा. रंजना बागल, सुधा कांबळे, ऋतुजा कदम यांनी प्रयत्न केले. यावेळी पदवी, पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Tarun Bharat-25/12/2023

सोमवार, २५ डिसेंबर २०२३

# विद्यार्थीनींनी निर्भय होऊन लढावे : उदय साळुंखे

**प्रतिनिधी**
विटा

विद्यार्थिनींनी कोणत्याही वाहनातून प्रवास करताना घाबरू नये. निर्भय होऊन समाजातील समाजकंटक आणि अन्यायाविरुद्ध लढावे. शरीर संपत्ती कमवून जशाच तसे उत्तर देण्यास तयार रहावे. कोणत्याही अडचणीत निर्भया पथक आपल्यासोबत आहे, असे प्रतिपादन निर्भया पथक प्रमुख उदय साळुंखे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विटा पोलीस स्टेशनचे निर्भया पथक प्रमुख उदय साळुंखे, तायक्वांदो क्रीडा प्रशिक्षक विजयकुमार कुंभार, उपप्राचार्य प्रा. विष्णू मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वसंरक्षण प्रशिक्षक विजयकुमार कुंभार यांनी स्वसंरक्षणाचे फायदे यांची माहिती दिली. शिबिरात जवळपास २५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

प्रास्ताविक ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. अमोल जमदाडे यांनी केले. सूत्रसंचालन दिपक पवार आणि रूपाली बाबर यांनी केले. तर आभार वैशाली जाधव यांनी मानले. प्राचार्य डॉ विठ्ठल शिवणकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी जिमखाना प्रमुख प्रा. एस. एम. जाधव, पर्यवेक्षक सर्जेराव सावंत, पांडुरंग मोहिते, निलेश माळी, अमोल दुबे, सविता बनसोडे, मनीषा शिंदे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



**विटा : प्राजक्ता सुतार हिच्यासोबत स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखविताना प्रशिक्षक विजयकुमार कुंभार.**

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Sakal-24/12/2023



## → अवतीभवती



**विटा :** बळवंत कॉलेजमध्ये मार्गदर्शन करताना प्रा. नेताजी दबडे. व्यासपीठावर विठ्ठल शिवणकर, आनंदराव खाडे आदी.

# विट्यात बळवंत कॉलेजमध्ये डिजिटल पेमेंट्स कार्यशाळा

**विटा :** पैशांची देवाणघेवाण अर्थव्यवस्थेची रक्तवाहिनी असते. जागतिकीकरणात डिजिटल पेमेंटशिवाय पर्याय नाही. काळजीपूर्वक वैयक्तिक, आर्थिक माहितीची सुरक्षितता ठेवणे आवश्यक आहे, असे मत प्रा. नेताजी दबडे यांनी व्यक्त केले. बळवंत कॉलेज येथे ज्युनिअर विभागात कार्यशाळा झाली. डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा झाली. उपप्राचार्य आनंदराव खाडे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य विष्णू मस्के, सर्जेराव सावंत, ओंकार शिंदे, अप्पासाहेब वानकर उपस्थित होते. नोटबंदीमुळे सर्वच स्तरातील नागरिक डिजिटल पेमेंट्सकडे वळले आहे. व्यवहारात गतिमानता आली आहे. ग्राहकांची वेळोवेळी फसवणूकही होते आहे. ती रोखण्यासाठी विविध वित्तीय संस्थांनी व्यवहार करणाऱ्या संस्थांनी सजग राहणे आवश्यक आहे. आर्थिक डेटा वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवावी लागते; अन्यथा डिजिटल पेमेंट जेवढा फायदा, तेवढा तोटादायकही ठरू शकते. विविध प्रकारे फसवणूक कशी होते, हे प्रात्यक्षिकाद्वारे समजून देण्यात आले. अजित साळुंखे, ओंकार कुंभार, नामदेव गुडघे, अशोक मोहिते, रुपाली बाबर, वैशाली जाधव यांनी परिश्रम घेतले. वाणिज्य विभागप्रमुख सविता बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. रामचंद्र मुजमुले, संताजी सावंत यांनी सूत्रसंचालन केले.

**PRINCIPAL**
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

Janpravas-24/12/2023

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# बळवंत कॉलेजमध्ये डिजिटल पेमेंट्सची कार्यशाळा उत्साहात

जनप्रवास । प्रतिनिधी

विटा : पैशाची देवाण-घेवाण हे अर्थव्यवस्थेची रक्तवाहिनी असते आणि त्यासाठी जागतिकीकरणाच्या स्पर्धेत डिजिटल पेमेंटशिवाय पर्याय नसून, स्पर्धेत टिकण्यासाठी काळजीपूर्वक वैयक्तिक तसेच आर्थिक माहितीची सुरक्षितता ठेवणे गरजेचे आहे, असे मत प्रा. नेताजी दबडे यांनी केले.

बळवंत कॉलेजमध्ये डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्युनिअर विभागाच्यावतीने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य आनंदराव खाडे होते. कार्यक्रमास उपप्राचार्य विष्णू मस्के, सर्जेराव सावंत, ओंकार शिंदे, आप्पासाहेब वानकर उपस्थित होते.



विटा : येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित कार्यशाळेप्रसंगी प्रा. नेताजी दबडे यांचा सत्कार करताना उपप्राचार्य आनंदराव खाडे. समवेत उपप्राचार्य विष्णू मस्के, सर्जेराव सावंत व अन्य.

स्मार्टफोनद्वारे कोणतीही व्यक्ती सहजपणे डिजिटल पेमेंट करू शकते, मात्र वैयक्तिक तसेच आर्थिक माहितीची गोपनीयता ठेवणे अत्यंत आवश्यक असते. नोटाबंदीमुळे सर्वच स्तरातील नागरिक आता डिजिटल पेमेंट्सकडे वळले आहेत. व्यवहारामध्ये गतिमानता आलेली आहे. मात्र ग्राहकांची वेळोवेळी फसवणूकही होत आहे, ती रोखण्यासाठी विविध वित्तीय संस्थांनी व्यवहार करणाऱ्या संस्थांनी सजग राहणे गरजेचे आहे. आर्थिक डेटा, वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवावी लागते, अन्यथा डिजिटल पेमेंट जेवढा फायदा तेवढा तोटाही असू शकतो. डिजिटल पेमेंटची माहिती देताना विविध स्लाईटच्या आधारे फसवणूक कशी होते, हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे समजून देण्यात आले. प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख सविता बनसोडे यांनी केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी अजित साळुंखे, ओंकार कुंभार, नामदेव गुडघे, अशोक मोहिते, रुपाली बावर, वैशाली जाधव यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रामचंद्र मुजमुले यांनी केले. आभार संताजी सावंत यांनी मानले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Tarun Bharat-24/12/2023

# जागतिकीकरण स्पर्धेत डिजिटल पेमेंटच पर्याय

## प्रा. नेताजी दबडे : बळवंत महाविद्यालयात डिजिटल पेमेंट्स माहिती कार्यशाळा




**विटा : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. नेताजी दबडे यावेळी अर्चना पवार, उपप्राचार्य आनंदराव खाडे, विष्णू मस्के, सर्जेराव सावंत आदी.**

प्रतिनिधी
विटा

पैशाची देवाणघेवाण ही अर्थव्यवस्थेची रक्तवाहिनी असते. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत डिजिटल पेमेंट शिवाय पर्याय नाही. स्पर्धेत टिकण्यासाठी काळजीपूर्वक, वैयक्तिक, आर्थिक माहितीची सुरक्षितता ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रा. नेताजी दबडे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात ज्युनिअर विभागाच्यावतीने डिजीटल पेमेंटस् माहिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. दबडे बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य आनंदराव खाडे होते. उपप्राचार्य विष्णू मस्के, सर्जेराव सावंत, ओंकार शिंदे, आप्पासाहेब वानकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

प्रा. दबडे म्हणाले, स्मार्टफोनद्वारे कोणतीही व्यक्ती सहजपणे डिजिटल पेमेंट करू शकते. मात्र वैयक्तिक, आर्थिक माहितीची गोपनीयता ठेवणे आवश्यक असते. नोटाबंदीमुळे सर्वच स्तरातील नागरिक डिजिटल पेमेंट्सकडे वळले आहेत. व्यवहारात गतिमानता आलेली आहे. मात्र ग्राहकांची फसवणूकही होत आहे. ती रोखण्यासाठी विविध वितीय, व्यवहार करणाऱ्या संस्थांनी सजग राहणे गरजेचे आहे आर्थिक डेटा वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवावी लागते. अन्यथा तोटा होऊ शकतो.

प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख सविता बनसोडे, सूत्रसंचालन रामचंद्र मुजमुले यांनी केले. तर आभार संताजी सावंत यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी अजित साळुंखे, ओंकार कुंभार, नामदेव गुडघे, अशोक मोहिते, रुपाली बाबर, वैशाली जाधव यांनी परिश्रम घेतले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Janpravas-18/12/2023

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# कल्पनाशक्ती ही यशस्वी उद्योजकाची गुरुकिल्ली

## ■ अर्चना पवार : बळवंत कॉलेजमध्ये यशस्वी उद्योजक कार्यशाळा उत्साहात

जनप्रवास । प्रतिनिधी

**विटा :** येथील बळवंत महाविद्यालयात यशस्वी उद्योजक कार्यशाळा उत्साहात पार पडली. यावेळी बोलताना कल्पकता कठोर परिश्रम आणि वेळेचे अचूक नियोजन केल्यास कोणतीही व्यक्ती आपल्याकडे असणाऱ्या कलागुणांचा वापर करून औद्योगिक क्षेत्रात यशस्वी होऊ शकते असे फर्नेस आणि हीटिंग व्यवसाय उद्योजिका व महाराष्ट्र शासन पुरस्कृत आदर्श उद्योजिका अर्चना पवार म्हणाल्या.

पवार पुढे म्हणाल्या, त्यासाठी भांडवल ,शिक्षण ,आणि छोट्या मोठ्या अडचणी फारशा परिणामकारक नसतात.

येथील बळवंत कॉलेजमधील जूनियर विभागाने प्राचार्य डॉ विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या यशस्वी उद्योजक व प्रेरणादायी व्याख्यान कार्यशाळेत त्या बोलत होत्या. कार्यशाळेस उपप्राचार्य डी टी देवकाते ,उपप्राचार्य विष्णू मस्के ,नेताजी दवडे ,आप्पासो वानकर ,रामचंद्र मुजमुले,दीपक पवार ,ओंकार कुंभार उपस्थित होते.



विटा येथे बळवंत कॉलेजमध्ये आयोजित यशस्वी उद्योजक कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आदर्श उद्योजिका अर्चना पवार.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अर्चना पवार पुढे म्हणाल्या, माझ्या व्यवसायाची सुरुवात अत्यंत गरीब परिस्थितीत झाली असून आज देश व देशाबाहेर आमचे प्रॉडक्ट जात आहेत आणि म्हणूनच जिद्द चिकाटी आणि हितचिंतकांनी दिलेली साथ याच्या जोरावरती अल्पशा जागी सुरू केलेला व्यवसाय आज जगभर प्रसिद्धीस येत आहे ज्यांना भविष्यकाळात यशस्वी उद्योजक व्हावयाचे आहे त्यांनी आत्तापासूनच आपल्या कलागुणांना आणि कल्पकतेला वाव देण्यासाठी उच्च दैवत ठेवून शिक्षण घ्यावे व्यवसायासाठी दृष्टिकोन महत्त्वाचा असतो आणि तो सकारात्मक राहण्यासाठी आपली उच्च विचारसरणी उपयोगी पडते उद्योगांमध्ये महिला आदर्श उद्योजिका म्हणून कार्यरत आहेत उद्योग करताना जेवढ्या जास्त अडचणी असतात तेवढे जास्त यश संपादन करता येते जेवढी जास्त विश्रांती घ्याल तेवढा आत्मविश्वास कमी होतो आणि म्हणून महिलांनीही आत्मविश्वासाने कार्य केल्यास नावलौकिक प्राप्त होतो आणि म्हणूनच माझ्या व्यवसायासाठी शासनाने २०२३ चा सर्वोत्कृष्ट लघुउद्योग पुरस्कार व २०२३ चा उद्यमरत्न पुरस्कार पुरस्कार दिलेले आहेत स्वागत व प्रास्ताविक मनीषा शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन मीनाक्षी पाटील यांनी केले तर आभार ओंकार शिंदे यांनी मानले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Lokmat-16/12/2023

## महत्त्वाच्या घडामोडी



विटा : पारितोषिक वितरण करताना माधवराव मोहिते, यावेळी प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, गजानन गायकवाड आदी.

# ‘बळवंत’ मधील विद्यार्थिनींची वक्तृत्त्व, निबंध स्पर्धेत बाजी

**विटा :** येथील बळवंत महाविद्यालयात आयोजित निबंध स्पर्धेत निकीता सावंत, जबीन मुल्ला यांनी यश मिळवले. तर वक्तृत्त्व स्पर्धेत अमृता तुकाराम सुतार, नीलम काशिनाथ यादव यांनी बाजी मारली. येथील बळवंत महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित निबंध आणि वक्तृत्त्व स्पर्धेचा बक्षीस वितरण झाले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागाचे माजी अध्यक्ष माधवराव मोहिते, गजानन बाबर, निवृत्त वाहतूक नियंत्रक गजानन गायकवाड, प्रा. देवकाते उपस्थित होते. प्राचार्य विठ्ठल शिवणकर अध्यक्षस्थानी होते. निबंध स्पर्धेत निकिता दत्तात्रय सावंत, जबिन सिकंदर मुल्ला, स्नेहल रवींद्र काळे, प्रियांका अनिल गुजले तर वक्तृत्व स्पर्धेत अमृता तुकाराम सुतार, नीलम काशिनाथ यादव, ऋतुजा संभाजी यादव, दुर्गा राजकुमार कांबळे यांनी प्रथम ते चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. परिक्षण डॉ. पी. बी. निकम, प्रा. पी. एच. निकम, प्रा. एम. पी. मासाळ, प्रा. बी. एम. ठाणेकर यांनी केले. स्पर्धा समिती प्रमुख डॉ. एस. एम. सय्यद, उपप्राचार्य प्रा. ए. टी. खाडे, डॉ. ए. एन जाधव, प्रा. एस. एस. बुद्धनवर, डॉ. जहांगीर मुलानी, प्रा. एम. एम. पाटील यांनी योगदान दिले. प्रास्ताविक डॉ. शहनाज सय्यद यांनी केले. सूत्रसंचालन कोमल धुमाळ यांनी केले. प्रा. सुनील बुद्धनवर यांनी आभार मानले.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Navrashtra-14/12/2023

नवराष्ट्र

# डॉ. बाबर यांना उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार प्रदान



विटा, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. रयत शिक्षण संस्थेच्या बळवंत कॉलेज येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रवीण बाबर यांच्या शोधनिबंधास डॉ. व्ही. एम. दांडेकर यांच्या नावाने देण्यात येणारा उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्काराने गौरवण्यात आले. शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनोमिक असोसिएशन, कोल्हापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या ३४ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये हा पुरस्कार देण्यात आला.

'प्रायव्हेटायझेशन इम्पॅक्ट ऑन लोकल गव्हर्नमेंट सर्विसेस' या विषयवार लिहिलेल्या शोधनिबंधात त्यांनी खासगीकरणाचा स्थानिक सरकारांच्या अर्थव्यवस्थांवरती होणाऱ्या परिणामांचा सूक्ष्म अभ्यास या पेपरमध्ये त्यांनी केला आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यांच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. शिवणकर यांनी अभिनंदन केले.

Paschim Maharashtra Plus Edition
14 December 2023 Page No. 3
epaper.navarashtra.com

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Sakal- 12/12/2023

दैनिक सकाळ मंगळवार 12/12/2023



विटा : उत्कृष्ट शोधनिबंधाचा पुरस्कार स्वीकारताना बळवंत महाविद्यालयातील डॉ. प्रवीण बाबर.

## डॉ. प्रवीण बाबर यांना उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार

**विटा** : येथील बळवंत महाविद्यालयामधील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रवीण बाबर यांच्या शोधनिबंधास शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक असोसिएशन, कोल्हापूर यांच्यातर्फे आयोजित ३४ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये डॉ. व्ही. एम. दांडेकर यांच्या नावाने देण्यात येणारा उत्कृष्ट शोधनिबंध पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. 'प्रायव्हेटायझेशन इम्पॅक्ट ऑन लोकल गव्हर्नमेंट सर्व्हिसेस' या विषयवार लिहिलेल्या शोधनिबंधात त्यांनी खासगीकरणाचा देशातील स्थानिक सरकारांच्या अर्थव्यवस्थांवर होणाऱ्या परिणामांचा सूक्ष्म अभ्यास या पेपरमध्ये केला आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर व सहकाऱ्यांनी अभिनंदन केले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

Tarun Bharat-11/12/2023

सोमवार, ११ डिसेंबर २०२३

# 'बळवंत' च्या रक्तदान शिबिरात ४१ जणांचे रक्तदान

## वसंतदादा पाटील ब्लड बँक यांचे सहकार्य



विटा : रक्तदान शिबिराच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, यावेळी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी.

प्रतिनिधी
विटा

येथील बळवंत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, एनएनसी, एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्यासह एचडीएफसी बँक विटा शाखेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, सेवक अशा एकूण ४१ जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरासाठी वसंतदादा पाटील ब्लड बँक, सांगली यांचे सहकार्य लाभले.

यावेळी प्राचार्य डॉ. शिवणकर म्हणाले, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेक गरजू रूग्णांना वेळेत रक्त मिळाल्याने त्यांचा प्राण वाचू शकेल. एक सामाजिक जाणीव म्हणून समाजातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीने रक्तदान केले पाहिजे. त्याचप्रमाणे रक्तदानाचे महत्त्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत पोहचविले पाहिजे. रयत शिक्षण संस्था, बळवंत महाविद्यालय रक्तदान शिबिरासारखे अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असते. याचा फायदा समाजाला चांगल्या प्रकारे होत आहे. यापुढेही ही परंपरा अखंडित राहील. असेही प्राचार्य डॉ. शिवणकर म्हणाले.

हे शिबीर यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण बाबर, उपप्राचार्य प्रा. ए. टी. खाडे, प्रा. डि. टी. देवकाते, डॉ. श्रेया पाटील, प्रा. संकेत राठोड, प्रा. राणी चव्हाण, डॉ. एस. एम. शेंडगे, कार्यालयीन अधीक्षक कुंदना लाडके, प्रा. राहुल पाटील, प्रा. प्रशांत गांजवे, प्रा. प्रसाद गवळी यांनी अतिशय चांगल्या प्रकारे परिश्रम घेतले.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

# Tarun Bharat-10/12/2023

पुढारी

## आंतरविभागीय धनुर्विद्या स्पर्धेत अनघा दीक्षितला कांस्य

**विटा : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये विट्याचे बळवंत महाविद्यालय आणि द्रोणा धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्राची खेळाडू अनघा दीक्षित हिने कांस्यपदक प्राप्त केले. तिची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



विटा : अनघा दीक्षितचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर. सोबत आई-वडील आणि एस. एम. जाधव, डी. टी. जमदाडे, दीपक पवार.

या स्पर्धा सातारा येथील एलबीएस कॉलेजमध्ये झाल्या. स्पर्धेत २० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. अनघा दीक्षित हिला जिमखाना प्रमुख एस. एम. जाधव, डी. टी. जमदाडे, दीपक पवार आणि सांगली जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रल्हाद जाधव, तेजस लेंगरे, द्रोणा धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्राचे राष्ट्रीय प्रशिक्षक अरबाज इनामदार यांचे मार्गदर्शन मिळाले.

Sangli Edition
Dec 10, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Tarun Bharat-10/12/2023

बातम्यांचा राजा
जनप्रवास

# अनघा दिक्षित हिची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ आर्चरी स्पर्धेसाठी निवड

जनप्रवास । प्रतिनिधी



**विटा :** बळवंत कॉलेज व द्रोणा धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्राची खेळाडू अनघा दिक्षित हिची भटींडा येथील पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ आर्चरी स्पर्धेमधून पाटणा (बिहार) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ आर्चरी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल तिला सांगली जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रल्हाद जाधव, प्रेरणास्थान तेजस लेंगरे यांनी तिचे अभिनंदन केले. तिला द्रोणा धनुर्विद्या प्रशिक्षक केंद्राचे राष्ट्रीय प्रशिक्षक अरबाज इनामदार यांचे मार्गदर्शन लाभले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Sakal-07/12/2023



विटा : राष्ट्रीय कार्यशाळेत सहभागी तज्ज्ञ मार्गदर्शक व मान्यवर.

# भाभा अणुशक्ती केंद्रातील तज्ज्ञांचे बळवंत महाविद्यालयात मार्गदर्शन

विटा, ता. ७ : बळवंत महाविद्यालयाचा भौतिकशास्त्र विभाग, आयक्यूएसी आणि इंडियन असोसिएशन फॉर रेडिएशन प्रोटेक्शन (आयएआरपी) मुंबई यांच्यातर्फे 'विकिरण तंत्रज्ञान आणि भारतीय आण्विक ऊर्जेचे फायदेशीर परिणाम' यावर राष्ट्रीय कार्यशाळा झाली. भाभा अणुशक्ती केंद्रातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. मुरली (सचिव, आयएआरपी, मुंबई) प्रमुख पाहुणे होते.

त्यांनी विज्ञानजगतातील विविध व्यवसाय संधींबाबत मार्गदर्शन केले. सौ. रुपाली कामत, डॉ. चित्रा सुब्रमण्यम, संजय पाटील यांनी 'विकिरण तंत्रज्ञान, विकिरण संरक्षण व ऊर्जेचे फायदेशीर परिणाम' यावर मार्गदर्शन केले. अणुऊर्जेचे महत्त्व विशद करणारी नाटिका झाली.

प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर अध्यक्षस्थानी होते. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. चंद्रकांत बोबडे, डॉ. प्रियांका शिंदे यांनी समन्वयक, तर डॉ. वनिता राऊत यांनी ऑर्गनायझिंग सेक्रेटरी म्हणून काम पाहिले. 'आयक्यूएसी'च्या डॉ. श्रेया पाटील यांचीही उपस्थिती होती. दिनेश धोंगडे, बजरंग पाटील, अनुराधा जाधव, श्रुती बाराते व संग्राम माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

Tarun Bharat-27/11/2023



विटा : बळवंत महाविद्यालयात संविधान दिनी शपथ घेताना विद्यार्थी, शिक्षक.

# बळवंत महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात

**विटा :** बळवंत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले. प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण बाबर, प्रा. संकेत राठोड, प्रा. संतोष कदम, प्रा. एन. एम. जगताप, प्रा. प्रसाद गवळी, डॉ. मलिकार्जुन बंदारे, प्रा. कैलास माने यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Muktagiri-27/09/2023

मुक्तागिरी

२०२३



विटा : प्रशांत सरुडकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर समवेत इतर मान्यवर

# कर्मवीरांनी समाज क्रांती यशस्वी केली : प्रशांत सरुडकर

मुक्तागिरी वृत्तसेवा

विटा, दि. २६ : कर्मवीरांनी शिक्षण चळवळ गतिमान केली. आदर्श समाज व्यवस्था निर्माण व्हावी, म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले. छत्रपती शाहू महाराजांची राजनीती, रणनीती, सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक तत्त्वज्ञान कर्मवीर अण्णांनी आत्मसात करून, गोरगरीब, बहुजन समाज आणि दीन-दलितांच्या झोपडी पर्यंत ज्ञानाची गंगा पोहोचवली, म्हणूनच कर्मवीरांचे स्मरण प्रत्येक घराघरात दररोज होणे गरजेचे आहे, असे मत प्रसिद्ध वक्ते लेखक व इतिहास अभ्यासक प्रशांत सरुडकर यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत महाविद्यालयात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मविभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ विठ्ठल शिवणकर होते.

सरुडकर पुढे म्हणाले, कर्मवीर अण्णांनी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांची शिक्षण रुपी चळवळ पुढे नेऊन शैक्षणिक कार्यांचा कळस रचला. बालपणापासून अन्याय अत्याचारा विरुद्ध बंड, अस्पृश्यता निवारण, जुन्या परंपरा विरोधी बंड, अंधश्रद्धा निर्मूलन करून पीडित समाजाला शिक्षित होण्यासाठी प्रयत्न केले. कर्मवीरांनी आणि वहिनींनी धनीनीच्या बागेमध्ये विविध जाती धर्मांच्या मुलांना एकत्र करून समाज परिवर्तनाचे कार्य केले. सण समारंभासाठी आपला एक एक सुवर्ण अलंकार मोडून वहिनी लंकेच्या पार्वती झाल्या आणि लक्ष्मीबाईनीही अण्णांच्या बरोबरीने मोलाचे योगदान दिले. बळवंत कॉलेजही कर्मवीरांना अभिप्रेत असणारा विद्यार्थी घडवीत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अण्णांच्या जीवनातील अनेक पैलू त्यांनी सहज ओघवत्या भाषेमध्ये विद्यार्थ्यांसमोर मांडले.

यावेळी डॉ. शिवणकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कर्मवीरांच्या एकशे छत्तीसाव्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात वक्तृत्व, निबंध, सुंदर सही, रांगोळी, मेहंदी, पाककला, केशभूषा, वेशभूषा, भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने रोख रकम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

उपप्राचार्य विष्णू मस्के यांनी प्रास्ताविक केले .स्वावलंबनाचा मंत्र विद्यार्थ्यांनी आत्मसात करून, त्यांनी ज्ञानकक्षा उंच कराव्यात असे आवाहन त्यांनी केले. बक्षीस निवेदन मनीषा शिंदे, रामचंद्र मुजमुले, डॉ दिनेश घोंगडे सूत्रसंचालन मृदुला रामटेके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजकुमार मोरे यांनी आभार मानले. उपप्राचार्य दत्तात्रय देवकाते, डॉ. श्रेया पाटील, आनंदराव खाडे, सर्जेराव सावंत उपस्थित होते.



PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Sakal-27/09/2023

# कर्मवीरांच्या समाजक्रांतीचे स्मरण हवे

## प्रशांत सरुडकर : विट्यातील बळवंत कॉलेजमध्ये व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

विटा, ता. २७ : "आदर्श समाजव्यवस्था निर्माण व्हावी, याकरिता कर्मवीरांनी प्रयत्न केले. छत्रपती शाहू महाराजांची राजनीती, रणनीती, सामाजिक बांधिलकी आणि शैक्षणिक तत्त्वज्ञान कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आत्मसात करून गोरगरीब, बहुजन समाज आणि दीन-दलितांच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोहोचवली, म्हणूनच त्यांचे स्मरण घराघरांत दररोज होणे आवश्यक आहे," असे मत प्रसिद्ध वक्ते लेखक व इतिहास अभ्यासक प्रशांत सरुडकर यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर होते.



**विटा :** बळवंत महाविद्यालयात व्याख्यानप्रसंगी बोलताना प्रशांत सरुडकर. व्यासपीठावर डॉ. शिवणकर व अन्य.

प्राचार्य डॉ. शिवणकर म्हणाले, "कर्मवीरांनी अन्यायाविरुद्ध बंड करण्याचे बाळकडू घेतले होते. अण्णा साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचे जीवन जगले. त्यांची विचारसरणी आजच्या सर्व मुलांनी व शिक्षकांनी पावलोपावली आचरणात आणली पाहिजे. यादृष्टीने सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी विविध उपक्रम राबवीत आहोत."

कर्मवीरांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात वक्तृत्व, निबंध, सुंदर स्वाक्षरी, रांगोळी, मेहंदी, पाककला, केशभूषा, वेशभूषा, भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. उपप्राचार्य विष्णू मस्के यांनी प्रास्ताविक केले. बक्षीस वितरणाचे निवेदन मनीषा शिंदे, रामचंद्र मुजमुले, डॉ. दिनेश धोंगडे यांनी केले. उपप्राचार्य प्रा. डी. टी. देवकाते, डॉ. श्रेया पाटील, प्रा. आनंदराव खाडे, सर्जेराव सावंत उपस्थित होते.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Sakal-09/09/2023

सकाळ

# विचार, व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षक पुढे

## प्राचार्य डॉ. शिवणकर : बळवंत महाविद्यालयामध्ये शिक्षक दिन उत्साहात

**विटा, ता. ८ :** विद्यार्थ्यांचे विचार, मत व व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांचा वाट मोठा असतो. त्यांनी योग्य शिक्षण देऊन जगासमोर उभं राहण्याची ताकद शिक्षकांमुळे येते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी व्यक्त केले. बळवंत महाविद्यालयामध्ये शिक्षक दिन कार्यक्रमप्रसंगी सेवक कल्याण समितीतर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



**विटा : बळवंत महाविद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रमात बोलताना डॉ. विठ्ठल शिवणकर.**

ते म्हणाले, ''जीवनात आई-वडिलांची जागा कुणीही भरू शकत नाही. सर्वांत पहिले गुरू आई-वडील असतात. भारतातील गुरु-शिष्य परंपरा येथील संस्कृतीमधील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. शिक्षकांच्या हाती देशाचे भविष्य असते. शिक्षकांमुळे भविष्यातील डॉक्टर, शास्त्रज्ञ, इंजिनिअर, लेखक, शिक्षक यांच्यासह अनेक क्षेत्रांत प्रगती करून देशाचे नाव उंचवणारी सामर्थ्यवान पिढी तयार होते.''

ते म्हणाले, ''डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी विविध विषयांचा अभ्यास केला होता. संस्कृतचा अभ्यास करून त्यांनी प्रस्थानत्रयी व समग्र भाष्यग्रंथ अभ्यासले. ते स्वतः एक उत्तम शिक्षक असल्यामुळे त्या पेशाबद्दल वाटणारे प्रेम व त्यासाठी केलेले कार्य यांचा सन्मान करण्यासाठी ५ सप्टेंबर हा त्यांचा जन्म दिवस शिक्षकदिन म्हणून साजरा करण्यास सुरवात केली.''

मराठी विभागप्रमुख, सेवक कल्याण समितीचे प्रमुख डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शहनाज सय्यद व प्रा. राणी चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. ए. सावंत यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
09/09/2023 Page No. 4

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Sakal-02/09/2023




**विटा :** बसस्थानक परिसरात स्वच्छता करताना बळवंत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.

# विटा बसस्थानक परिसरात स्वच्छता

**विटा :** बळवंत कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना व नगरपरिषद यांच्यातर्फे शहरातील बस बस स्थानक परिसरामध्ये भारत सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा, त्याचबरोबर स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यामध्ये विटा बस स्थानक व आसपासच्या परिसर बळवंत राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी स्वच्छ केला. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी बळवंत कॉलेजचे प्राचार्य विठ्ठल शिवणकर, ज्युनिअर कॉलेज उपप्राचार्य प्रा. मस्के यांचे मार्गदर्शन मिळाले. उपक्रम यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. प्रवीण बाबर, ज्युनिअर कॉलेजचे प्रा. संतोष कदम यांनी सहकार्य केले.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Sakal-27/08/2023

# आपुलकीची नाती कवितासंग्रहाचे प्रकाशन

**विटा :** प्रेमाचा महासागर म्हणजे नाती. या नात्यांमध्ये एक आंतरिक जिव्हाळा असतो. माणसाचा सर्वांगीण विकास नात्यांमध्येच होत असतो, हे अमृता सुतार हिने आपल्या 'आपुलकीची नाती' या कवितासंग्रहातील कवितांमधून सांगितले आहे, असे मत बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी व्यक्त केले. ते महाविद्यालयातील बी. एस्सी. भाग २ मधील अमृता तुकाराम सुतार लिखित 'आपुलकीची नाती' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्रा. डी. टी. देवकाते, डॉ. श्रेया पाटील, प्रा. डॉ. सी. आर. बोबडे, प्रा. डॉ. दिनेश वाघुंबरे उपस्थित होते.

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY * VITA *

Muktagiri-26/08/2023

दैनिक मुक्तागिरी

## संक्षिप्त वृत्त



**विटा :** डॉ. विठ्ठलराव शिवणकर यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर

# बळवंत महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. शिवणकर यांची नियुक्ती

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**विटा, दि. २५ :** येथील बळवंत महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. विठ्ठलराव शिवणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सातारा येथून रयत शिक्षण संस्थेच्या सचिव पदाचा कार्यभार सांभाळताना गतिमान प्रशासन देऊन आणि श्री छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे स्पर्धा परीक्षा केंद्रात अनेक अधिकारी घडवून आत्ता बळवंत कॉलेज येथे डॉ. शिवणकर पदभार स्वीकारत आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या वडिलांच्या नावे सुरू असलेल्या बळवंत कॉलेज विटा येथून श्री छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे डॉ. राजेंद्र मोरे बदलीने पदभार स्वीकारण्यासाठी जात आहेत बळवंत कॉलेजच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी आपले मोलाचे योगदान देताना महाविद्यालयास A++ मानांकन मिळवून देऊन महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली.

Aug 26, 2023 Page No. 6
emuktagiri.in
powered by thoughtpad infotech

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Muktagiri-26/08/2023

**नवराष्ट्र**

# खोट्या अमिषाला बळी पडू नका

## पूजा महाजन यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**विटा,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विद्यार्थ्यांनी तारुण्यवस्थेत उद्दिष्ट निश्चित करावे, वेळेचा आणि श्रमाचा मेळ घालून योग्य दिशेने परिश्रम घेतल्यास उज्वल यश मिळते. मुलींनी खोट्या अमिषा बळी पडू नये,असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक पूजा महाजन यांनी केले.

येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ विठ्ठल शिवणकर होते कार्यक्रमास उपप्राचार्य विष्णू मस्के पर्यवेक्षक सर्जेराव सावंत संताजी सावंत, रामचंद्र मुजमुले उपस्थित होते.

उपप्राचार्य विष्णू मस्के यांनी प्रास्ताविक केले. मनीषा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सर्जेराव सावंत यांनी आभार मानले. सविता बनसोडे, अमोल ठुबे प्रसाद खोत, सुजाता पाटील वैशाली जाधव, रूपाली बाबर उपस्थित होते

### पोलीस स्टेशनचे सहकार्य राहील

महाजन पुढे म्हणाल्या, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आई-वडिलांना व शिक्षकांना मित्र माना आपणाकडून कोणतीही चूक होणार नाही. याची दक्षता घ्या कोणावरही अन्याय होणार नाही. याचीही काळजी घ्या आणि चिकाटी व जिद्द उराशी बाळगून ग्रामीण भागातील विद्यार्थीही यशाची शिखरे पार करू शकतात सरावाने सर्व काही साध्य करता येते त्यासाठी शहरी आणि ग्रामीण असा दुजाभाव होत नाही. गुन्हेगारी प्रतिबंध व कायदेविषयक ज्ञान आत्मसात केल्यास आपण बहुतांश गुन्हे रोखू शकतो त्यासाठी पोलीस स्टेशनचे संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली.



Paschim Maharashtra Plus Edition
26 August 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com

PRINCIPAL
Balwant College, Vita
Dist-Sangli.

BALWANT COLLEGE
LIBRARY
VITA

Lokmat-17/08/2023

# 'बळवंत'चा डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाशी सामंजस्य करार

## प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांची माहिती



**विटा : सामंजस्य करारपत्र सुपुर्द करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यावेळी प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. आर. एस. पाटील, डॉ. सी. आर. बोबडे आदी.**

प्रतिनिधी
विटा

बळवंत महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र विभाग आणि डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. महाविद्यालयीन स्तरावर संशोधनाला चालना मिळण्याच्या हेतूने सामंजस्य करार करण्यात आला आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी दिली.

यावेळी विद्यापीठाचे डीन आणि रिसर्च डायरेक्टर प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे, हेल्थ आणि अलाईड सायन्स विभागाचे प्रा. डॉ. आर. एस. पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, फिजिक्स विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. सी. आर. बोबडे, फिजिक्स विभागाच्या एमएस्सी समन्वयक डॉ. वनिता राऊत, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रेया पाटील उपस्थित होत्या.

सामंजस्य करार पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संशोधनाच्या बाबतीत महत्त्वाचा ठरणार असल्याची माहिती रिसर्च डायरेक्टर प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे यांनी दिली. यावेळी पेटंट फायलिंग आणि कॉपीराईट याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. सामंजस्य कराराच्या माध्यमातून विद्यापीठातील संशोधन सुविधांचा फायदा महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थी आणि शिक्षकांना होणार आहे. सामंजस्य कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी संयुक्त कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित करण्यास मदत होईल. या कराराद्वारे दोन्ही संस्थांमध्ये संशोधनाला बळकटी मिळेल, अशी अपेक्षा प्राचार्य डॉ. मोरे यांनी व्यक्त केली.

BALWANT COLLEGE LIBRARY VITA

Lokmat-02/08/2023

लोकमत

# 'बळवंत' ला नॅककडून 'ए प्लस प्लस'

लोकमत न्यूज नेटवर्क

**विटा** : येथील रयत शिक्षण संस्थेच्या बळवंत महाविद्यालयाला राष्ट्रीय मूल्यांकन समिती (नॅक) यांच्याकडून चौथ्या मूल्यांकनात 'ए डबल प्लस' असे मानांकन प्राप्त झाले. महाविद्यालय हीरक महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना हे मानांकन मिळाल्याने विटा येथे जल्लोष करण्यात आला.

राष्ट्रीय मूल्यांकन समितीने दि. १७ व १८ जुलै २०२३ रोजी बळवंत महाविद्यालयाला भेट दिली होती.



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या वडिलांच्या नावाने १९६३ला स्थापन झालेले बळवंत महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील नामांकित म्हणून ओळखले जाते. महाविद्यालयात कनिष्ठ, वरिष्ठ पदव्युत्तर आणि व्यावसायिक स्तरावर कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत जवळपास पाच हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. विटा व परिसरातील २५ ते ३० गावातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय महाविद्यालयाने केली आहे. हजारो माजी विद्यार्थी विविध क्षेत्रामध्ये मोठ्या हुद्द्यावर कार्यरत आहेत. महाविद्यालयात १११ तज्ज्ञ प्राध्यापक, ४४ प्रशासकीय सेवक कार्यरत आहेत. रयत शिक्षण संस्थेचा आदर्श महाविद्यालय पुरस्कार मिळाला आहे

Hello Sangli
Page No. 2 Aug 08, 2023
Powered by: erelego.com

BALWANT COLLEGE LIBRARY VITA